# सृजनरंग

अंक – २

जुलै २०२२



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष : सृजनरंग : अंक – २


- **प्रवर्तक** : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन
- **प्रेरणा** : **मा. रणजितसिंह देओल,** (भा.प्र.से.)
  मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
- **मार्गदर्शन** : **मा. सूरज मांढरे,** (भा.प्र.से.)
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
- **प्रकाशक** : **एम. डी. सिंह**
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादक** : **रमाकांत काठमोरे**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक** : **विकास गरड**
  प्राचार्य, (समन्वय विभाग)
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **मनिषा यादव**
  वरिष्ठ अधिव्याख्याता, आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **निर्मिती समन्वयक** : **सुवर्णा पवार**
  विषय सहायक, आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **तज्ज्ञ समिती** : **डॉ. संदीप पवार** (वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रत्नागिरी)
  **राणी पाटील** (अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर)
  **संदीप वाकचौरे** (विषय सहायक, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अहमदनगर)
  **तरुबेन पोपट** (निवृत्त मुख्याध्यापिका, पुणे)
  **सुवर्णा देशपांडे** (माध्यमिक शिक्षिका, डे. ए. सो. चे न्यू इंग्लिश स्कूल, सातारा)
  **निवृत्ती आहेर** (मुख्याध्यापक, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय आदर्श शाळा भोयेगाव, जि. नाशिक)
- **मुखपृष्ठ रचना** : **नीताली हरगुडे** (कला शिक्षिका, सरिता विद्यालय, पुणे)
- **मलपृष्ठ रचना** : **विवेकानंद पाटील** (कलासाम्राज्यम्, पुणे)
- **अंक – २** : जुलै २०२२
- **मुद्रक** : रुना ग्राफिक्स, पुणे.

# सृजनरंग

अंक - २

## आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष




राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# प्रस्तावना

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२०/प्र.क्र. १४३/एस.डी.६, दि. ५ मार्च, २०२१ अन्वये राज्यात ४८८ शाळांची आदर्श शाळा (Model School) म्हणून निवड करण्यात आली. या शाळांमध्ये सुरू असणारे विविध उपक्रम राज्यातील इतर शाळांपर्यंत पोहोचले जावेत. तसेच यापासून प्रेरणा घेऊन नवनवीन उपक्रम आपल्या कल्पकतेने राबवून शालेय गुणवत्तेचा आलेख उंचाविण्याच्या उद्देशाने 'सृजनरंग' या ई-अंकाची निर्मिती राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेमार्फत करण्यात येत आहे.

आपण सर्वजण जाणतो की, एकविसावे शतक हे गतिमान असून अनेकविध क्षेत्रांत सातत्याने बदल घडत आहेत. त्याच अनुषंगाने समोर येणारी आव्हाने यशस्वीपणे पेलण्यासाठी सक्षम होणे व जाणीवपूर्वक ज्ञान प्राप्त करून कौशल्ये अंगीकृत करणे आवश्यक आहे.

एकविसाव्या शतकातील शिक्षण हे सर्जनशील, चिकित्सक विचार, सहयोग, सहकार्य आणि संप्रेषण/संवाद यांवर भर देणारे आहे. माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात वेगाने प्रगती झाल्यामुळे घरबसल्या संसाधने उपलब्ध असणाऱ्या विद्यार्थ्यांना माहितीचा महासागर सहजगत्या उपलब्ध होत आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी परिणामकारक अध्ययन-अध्यापन पद्धती अवलंबविण्याची गरज आहे. यासाठी विविध कार्यनीतींचा वापर शिक्षकांकडून होणे अपेक्षित आहे. शालेय अभ्यासक्रमातील विषयनिहाय विशिष्ट अथवा क्लिष्ट संकल्पना विद्यार्थ्यांपर्यंत अचूकपणे पोहोचविण्यासाठी शिक्षकांनी विविध तंत्रे व कौशल्ये यांचे ज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे. तसेच यासाठी पूरक कौशल्यांचा समुच्चय आपल्या अंगी असणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच विविध आव्हाने यांचा सामना करण्यासाठी आपल्या ठायी आत्मविश्वास निर्माण करून, जीवन सुकर करणे ही सध्या काळाची गरज आहे.

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० तसेच पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान यांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या दृष्टिकोनातून आपल्या शाळांमध्ये अनेकविध उपक्रमांना प्रारंभ झालेला आहे. 'शाळा एक समूह' म्हणून शालेय स्तरावर विविध उपक्रम राबवीत असताना अनेक आव्हानांना सकारात्मकतेने सामोरे जाऊन शालेय गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न केले जात आहेत. हे कार्य निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

गुणवत्तावाढीबरोबरच सुजाण नागरिकत्वाप्रत जाण्यासाठी नावीन्यपूर्ण विचारधारा आणि उपक्रमांचा स्वीकार करून आपण सृजनशील दिशेने वाटचाल करू या. अशाच उपक्रमांवर आधारित 'सृजनरंग' या ई-अंकाचे आपण नक्कीच स्वागत कराल, अशी खात्री बाळगतो.

**एम. डी. सिंह**
संचालक,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

# अनुक्रमणिका


◈ **शाळा : एक समूह** १
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुंबेफळ, तालुका आंबेजोगाई, जि. बीड

◈ **वाटचाल सृजनशीलतेकडे** ४
जि. प. उच्च प्राथमिक शाळा कात्री, ता. कळंब, जि. यवतमाळ

◈ **वाटचाल सौजन्यशीलतेकडे** ७
रायगड जि. प. आदर्श शाळा खरसई मराठी उच्च प्रा. शाळा गोंधळी, ता. म्हसळा, जि. रायगड

◈ **वाटचाल सृजनशीलतेकडे** ९
कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय सुरवाणी, ता. जिंतुर, जि. परभणी

◈ **दप्तराविना शनिवारचा दिवस** १२
जि. प. प्राथ शाळा सावंगी, (म्हा.) केंद्र. केहाळ, ता. जिंतूर, जि. परभणी

◈ **सृजनशील अभिव्यक्ती उपक्रम** १६
जि. प. शाळा करुंगली, ता. शिराळा, जि. सांगली.

◈ **यशोगाथा – एक ब्रिटिशकालीन शाळा ते आंतरराष्ट्रीय दर्जाची आदर्श शाळा** १९
भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा, खर्डी नं. १, ता. शहापूर, जि. ठाणे

◈ **आपला वर्ग १००% प्रगत करू!** २३
आदर्श शाळा माझगाव, ता. मुरुड, जि. रायगड.

◈ **‘कुणी न राहो दुर्बल अज्ञ, याचसाठी हा शिक्षण यज्ञ’** २५
केंद्रीय प्राथमिक शाळा वेतवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

◈ **वाटचाल सृजनशीलतेकडे** २७
जिल्हा परिषद कन्या प्रशाला परभणी, जि. परभणी

# शाळा : एक समूह

शिक्षण ही अविरत चालणारी प्रक्रिया आहे. तसेच जीवनाच्या सर्वांना स्पर्श करणारी सर्वस्पर्शी विचारधारा आहे म्हणूनच शिक्षणाचा विचार आणि व्यवस्था यांच्या संबंधातील गुणवत्ता त्या त्या स्तरावर जोपासण्याचे कार्यशाळेमधून प्रयत्न होत असतात. या स्पर्धात्मक संगणकीय युगात आपले मूल सर्वगुणसंपन्न व्हावे व त्याने उच्चतम यश मिळवावे या विचाराने प्रेरित बीड जिल्ह्यातील पहिली आंतरराष्ट्रीय शाळा म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुंबेफळ या शाळेचा उल्लेख केला जातो. सध्या शाळेत ३८९ विद्यार्थी अध्ययन करतात. यापूर्वी भौतिक सुविधांअभावी भरविण्यात येणारी शाळा आज जिल्हा परिषद शाळांसाठी आदर्श शाळा ठरली आहे. कुंबेफळ हे गाव अंबा शुगर फॅक्टरीपासून साधारणतः पाच किलोमीटर अंतरावर आंबेजोगाई




तालुक्याच्या पश्चिमेस वसलेले आहे. **सुमारे तीन हजार लोकसंख्या असलेले शहरालगत शेगाव स्वतंत्र ग्रामपंचायत कारभार आहे.** ग्रामीण सांस्कृतिक परंपरेचे वेष्टण असलेले गाव शैक्षणिक प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. बहुतांश पालक शेतकरी आहेत. उत्तम शेती करणाऱ्या सधन पालकांची संख्या कमी असली तरी जमिनीचा पोत चांगला आहे. मजूरवर्ग, लहान-मोठे व्यावसायिक, कमी प्रमाणात असलेला नोकर वर्ग मिळून समाज विकसित झाला आहे. या टुमदार गावात आमची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वसली आहे.

सन २००९ साली शाळेत अवघ्या बारा खोल्या होत्या. त्यातील काही खोल्यांची अवस्था बिकट होती. इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत प्रत्येक वर्गाच्या दोन तुकड्या होत्या. अशा एकूण १४ वर्ग तुकड्या होत्या. निरस भिंती, एकाच वर्गखोलीत दोन वर्ग अशी जागेअभावी मुले अध्ययन करीत असत. त्यात अडचणी यायच्या तसेच अंबाजोगाई तालुक्यापासून कुंबेफळ जवळ असून गावच्या परिसरात दोन इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू

झाल्याने पालकांचा ओढा इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे जास्त वाढू लागला. त्यावर उपाय म्हणून शिक्षकांनी एकजुटीने विविध उपक्रम राबविण्यास सुरुवात केली. जसे : नटखट कलादालन, बालवाचन, टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तूनिर्मिती, मासिक बालसभा, लेखन स्पर्धा इत्यादी उपक्रम राबवून शाळेचे वातावरण उत्साही व आनंददायी बनविले. २०१५ या शैक्षणिक वर्षात राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या आदर्श शिक्षिका श्रीमती उषा मुकेशचंद्र रामधामिया यांनी मुख्याध्यापक पदाचा पदभार स्वीकारला आणि एक वर्षाच्या कालावधीत त्यांनी शाळा नावारूपाला आणण्यासाठी भरपूर प्रयत्न केले. या खडतर प्रवासात गावकऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक वर्ग, ग्रामपंचायत सदस्य, पालक आणि शिक्षणप्रेमी यांच्या बरोबरीने शाळा प्रगतीचा महामेरू उचलण्यास मदत केली; ती म्हणजे गावच्या आजी-माजी सरपंच यांनी.

मध्यमवर्गीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल पालकांची मुले शाळेत येतात. श्रमिक व मजूर वर्गाच्या पालकांचे पाल्य शिक्षकांच्या विश्वासावर सोपवून पालक निश्चिंत घराबाहेर पडतात. अशा पाल्यांसाठी ग्रामस्थ व शिक्षक यांनी सर्वांगीण शिक्षणाचा विडा उचलला. गावच्या माजी सरपंच यांनी आयडीबीआय बँकेतर्फे अनुदान प्राप्त करून सुसज्ज व आधुनिक स्वच्छतागृह बांधले. हात धुण्यासाठी सेंटर उभे केले. सेंटरच्या सांडपाण्यावर परसबाग फुलविली. शाळेत ई-लर्निंग करण्याचा विचार समोर आला. शिक्षकांनी रु. १८,०००, सरपंचांनी रु. ५,००० व गावकऱ्यांच्या योगदानातून ई-लर्निंग हॉल सुसज्ज झाला. त्यासाठी जमिनीवरील मॅट, पडदे, संगणक याबरोबरच स्क्रीनचीही व्यवस्था केली. तांत्रिक युगात विद्यार्थ्यांची अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक रंजक व आनंददायी झाली. २२ जून २०१५ च्या 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' शासन निर्णयानुसार कुमठे बीट सातारा या शाळेला भेट देऊन आल्यानंतर शिक्षकांमध्ये नवचैतन्याची लाट उसळली. त्यातून सर्व वर्गखोल्यांमधील भिंतींवर ज्ञानरचनावादी चित्रांची रंगरंगोटी करण्यात आली. ज्ञानरचनेवर आधारित अध्ययन-अध्यापन पद्धतीमुळे शिक्षकांच्या महत्त्वाकांक्षी चेहऱ्यावर समाधान दिसले व प्रगतीचा आलेख उंचावत गेला.

सहशालेय उपक्रमाबरोबर लेखन स्पर्धा, प्रश्नमंजूषा, विद्यार्थ्यांचा वाढदिवस साजरा करणे, योगासने, चिकटपुस्तके, बालमासिके, विद्यार्थी हस्तलिखिते, परिसर क्षेत्रभेटींमध्ये शैक्षणिक सहल, महिला किशोरी मेळावे, मीना-राजू मंच अंतर्गत उपक्रम राबवून तसेच माजी विद्यार्थी यशोगाथा उपक्रम राबविला. त्यातून अठरा ते वीस हजारांची रक्कम जमा झाली. तसेच लोकसहभागातून तीन लाख रुपये रक्कम जमा झाली. या निधीतून शाळेची किरकोळ दुरुस्ती, इमारत नूतनीकरण, रंगरंगोटी, सजावट, परिसर सुशोभीकरण, शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, स्वच्छतागृहांची संख्या वाढविणे इत्यादी बाबी करण्यात आल्या. तसेच विजेच्या प्रश्नावर तोडगा म्हणून इन्व्हर्टरची व्यवस्था करण्यात आली. शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षांनी शाळेच्या अग्रभागाची लोखंडी कमान शाळेला भेट स्वरूपात दिली. एकूण २० वर्गखोल्यांची इमारत तयार झाली. या सर्व गोष्टींमुळे शाळेला आयएसओ मानांकन प्राप्त झाले. यामध्ये शिक्षकांनी स्वतः मार्च-एप्रिल महिन्यात शाळेच्या वेळेव्यतिरिक्त थांबून जमिनीलगत असलेल्या तीन फूट उंचीच्या भिंतीला रंगरंगोटी केली. योगायोगाने अंबाजोगाई तालुक्यातील एक बचत गट शाळा भेटीसाठी आला. सर्व सदस्यांनी शाळा पाहणी

केली. स्वच्छ व हिरवागार शालेय परिसर, उत्साही विद्यार्थी व आनंददायी वातावरण पाहून ती मंडळी भारावून गेली. त्यांनी सर्व वर्ग डिजिटल बॅनरने सजवून देण्याची जबाबदारी घेतली. वर्गातील भिंतीवर डिजिटल बॅनर व एक भिंत या चित्रकाराने रंगविली. पाहता पाहता सर्व वर्गांचे रूपच पालटले. दुग्धशर्करायोग असा की, दि. १ मे महाराष्ट्र दिनाच्या शुभमुहूर्तावर शाळेला आयएसओ मानांकन मिळाले.

शाळेची कीर्ती सर्वदूर पसरू लागली. अंबाजोगाई तालुक्यातील नामांकित संस्थांच्या शाळाभेटी होऊ लागल्या. इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे ओढा असलेले पालकांचे मतपरिवर्तन झाले. शाळेची पटसंख्या वाढू लागली. पाहता पाहता शाळेची पटसंख्या ३९१ वर गेली. त्यातच 'मानव लोक' या सेवाभावी संस्थेने शाळेला टॉयबँक भेट दिली. तसेच अभिजीत जोंधळे व त्यांचे सहकारी गुंडाळे सर यांची 'मैत्री पुस्तकांशी' या उपक्रमांतर्गत शाळेत भेट झाली. त्यांनी मुलांसाठी पुस्तके आणि मराठी विषयाच्या तासिका घेऊन मार्गदर्शन केले. शाळेची गुणवत्ता पाहून शासनाने विज्ञान प्रयोगशाळेसाठी साहित्य उपलब्ध करून दिले. सुसज्ज विज्ञान प्रयोगशाळा उभी राहिली, ज्या ठिकाणी विद्यार्थी स्वतः प्रयोग करतात, निष्कर्ष काढतात व साहित्य हाताळतात.

सध्या शाळेत मुख्याध्यापक म्हणून श्रीमती एम. के. हजारे कार्यरत आहेत, तर श्रीमती एल. व्ही. जाधव, श्रीमती पी. जी. शास्त्री, जी. एन. कांबळे, एन. जी. जिरगे, श्रीमती एम. व्ही. मुंडे, डी. एम. कसबे, एम. एम. गायकवाड, श्रीमती एम. एम. तोडकर, एस. एल. गायकवाड, एम. आर. गूळभिले, एम. पी. सरवदे, एम. ए. अंबुरे हे शिक्षक एकमताने, एकजुटीने, एकदिलाने काम करीत आहेत. याचे फलित म्हणून प्रगत शाळा सिद्धी अंतर्गत शाळेला 'अ' श्रेणी मिळाली. शाळेतील शिक्षकांची धडपड पाहता ग्रामस्थांनी शिक्षकांवर विश्वास दाखवून शाळा आंतरराष्ट्रीय करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय शिक्षकांपुढे प्रस्तावित करण्यात आला. शाळा गुणवत्ता तपासणीसाठी समिती आली आणि सन २०१८-१९ च्या मे महिन्यात शाळेला आंतरराष्ट्रीय संलग्नता प्राप्त झाली.

मनोरंजनातून शिक्षण आणि शिक्षणातून मनोरंजन या उद्देशाने शाळा विविध सहशालेय उपक्रम राबवीत असते. ज्यामध्ये विद्यार्थी राख्या व आकाशकंदील बनविण्याचे वर्कशॉप, विविध गुणदर्शन कार्यक्रम, तसेच बालसाहित्य मेळावे, ग्रंथदिंडी, विविध शालेय क्रीडा स्पर्धा, आनंदनगरी, अपूर्व विज्ञान मेळावा, वेशभूषा स्पर्धा असे अनेक उपक्रम शाळा राबवीत असते आणि म्हणूनच एक उपक्रमशील शाळा म्हणून दैनिक लोकमत ने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुंबेफळ, तालुका अंबाजोगाई या शाळेची दखल घेतली आहे.

https://youtu.be/vkkGWLH_d४ या यू-ट्यूब लिंक द्वारे ६ मिनिटात संपूर्ण शाळा एक समूह असतो याची प्रचिती येईल.

मुख्याध्यापक, श्रीमती हजारे मीना किसनराव

लेखन : अंबूरे एम. ए., सरवदे एम.पी., कसबे डी. एम.

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुंबेफळ, तालुका आंबेजोगाई, जि. बीड**

# वाटचाल सृजनशीलतेकडे

शाळा ही एक अनौपचारिक शिक्षण देणारी ज्ञान शाखा आहे, शिक्षणामुळे ज्ञान वृद्धिंगत होते, त्यामुळे प्रत्येकाला उचित शिक्षण घेणे आज काळाची गरज बनली आहे. विद्यार्थी–शिक्षक–समाज या त्रिसूत्रीकरणावरच देशाचे भवितव्य अवलंबून असते आणि विद्यार्थी हे देशाचे भविष्य आहे; कारण राष्ट्र विकासाला आणि देशाच्या पायाभरणीला विद्यार्थी हेच केंद्रबिंदू मानून शैक्षणिक यंत्रणा प्रयत्न करताना दिसते आणि विद्यार्थ्याला उचित शिक्षण देण्यासाठी शाळा हेच माध्यम आहे. शाळेतून विद्यार्थी आयुष्याच्या जडणघडणीचे शिक्षण घेत असतो.

**विद्यार्थ्यांपुढील शैक्षणिक अडचणी :**

आदर्श शाळा म्हणून सृजनशीलतेकडे वाटचाल करताना आव्हानात्मक बाबींना सामोरे जावे लागते सद्य:स्थितीत मुलांच्या वागणुकीत व कृतीत बदल जाणवला, मुले चिंताग्रस्त, भयपूर्ण वातावरणाला बळी ठरली आहेत. विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता विकसित करण्यासाठी पुढील आव्हाने स्वीकारून मार्गक्रमण केले.

- मुले स्वतःहून अभ्यास करायला लागणे.
- प्रत्येक मुलापर्यंत शिक्षण पोहोचणे.
- प्रत्येक विद्यार्थ्याच्या गतीने त्याला शिकू देणे.
- अध्ययनाबरोबरच व्यक्तिमत्त्व विकास साधणे.

**शाळेत राबविण्यात आलेले नावीन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम :**

शाळा आणि शिक्षकांनी विकासाची कास धरून विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी अनेक आव्हाने स्वीकारून आधुनिक तंत्रज्ञान, अध्ययन–अध्यापनाचे विविध उपक्रम अमलात आणून विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी अविरत प्रयत्न सुरू आहेत.

**प्रवेशोत्सव :**

इयत्ता पहिलीच्या प्रवेशपात्र विद्यार्थ्यांचा 'शाळा प्रवेशोत्सव' उत्साहात साजरा करण्यात आला, पहिल्या वर्गात नव्याने दाखल विद्यार्थ्यांना त्यांच्या घरी जाऊन फुले, चॉकलेट आणि उपलब्ध पाठ्यपुस्तके वाटप यांचे वाटप करण्यात आले. आपण शाळेत दाखल झालो व आपल्याला शाळेत जायला मिळणार हा आनंद मुलांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता.

**महादीप :**

विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण व्हावी यासाठी महादीप हा उपक्रम शिक्षण विभाग, जि. प. यवतमाळ यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. परीक्षेसाठी संदर्भ पुस्तके, PDF पुरविण्यात आल्या आहेत. या

उपक्रमावर आधारित ऑनलाइन सराव चाचणी विद्यार्थी नियमितपणे सोडवितात. शाळा स्तरावर महाराष्ट्र, राज्य, भारताचा इतिहास, मी वैज्ञानिक, सुंदर माझे जग या विषयांवर परीक्षा घेतल्या गेल्या, त्यानंतर केंद्र स्तर, तालुका स्तर आणि शेवटी जिल्हा स्तर या पद्धतीने परीक्षेचे आयोजन केले आहे त्याप्रमाणे विद्यार्थ्यांची नियमित तयारी करून घेतली जाते.

**शिक्षक दिन :**

दिनांक ५ सप्टेंबर रोजी 'डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन' यांची जयंती तथा शिक्षक दिनानिमित्त thank a teacher अभियानांतर्गत शिक्षक कार्य गौरव सप्ताह साजरा करण्यात आला. यामध्ये निबंध लेखन, काव्य वाचन, काव्य लेखन, चित्रकला, वक्तृत्व अशा ऑनलाइन व ऑफलाइन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले #tag चा वापर करून विद्यार्थ्यांनी तयार केलेले साहित्य social media वर अपलोड करण्यात आले.

**गोष्टीचा शनिवार :**

महिन्याच्या प्रत्येक शनिवारी गोष्टीचा शनिवार हा उपक्रम राबविला जातो. प्रत्येक आठवड्याला आलेल्या नवनवीन ज्ञानवर्धक गोष्टी मित्रांकडून, शिक्षकांकडून फोनकॉलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे श्रवण, वाचन, लेखन, संभाषण ही कौशल्ये विकसित होण्यास मदत होते.

**माझी कविता-माझे विश्व :**

शाळेतील बरेच विद्यार्थी कविता लिहितात, दिलेल्या विषयांवर व्यक्त होतात; म्हणूनच विद्यार्थ्यांच्या काव्य प्रतिभेस वाव मिळावा यासाठी विविध विषयांवर काव्य लेखन करण्यास प्रोत्साहित केले जाते. तयार केलेल्या कवितांचा नियमितपणे संग्रह केला जातो, विविध स्तरांवर होणाऱ्या काव्य लेखन स्पर्धेमध्ये विद्यार्थी सहभागी होतात.

**कल्पनांचे प्रतिबिंब :**

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना आठवड्यातून नियमितपणे एक दिवस कात्रणाच्या स्वरूपात चित्र दिले जाते. त्याआधारे विद्यार्थी स्वतःच्या कल्पनेने चित्राचे वर्णन करतात, या माध्यमातून विद्यार्थ्यांचे लेखन सुधारण्याची संधी मिळते. लिखाणातील चुका विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देता येतात, या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांना वह्या पुरविण्यात आलेल्या आहेत. त्यात चित्र आणि चित्राचे वर्णन संग्रही ठेवण्यात येत आहे.

**वृक्ष माझे मित्र :**

विद्यार्थ्यांना पर्यावरणाविषयी आवड, अभिरुची निर्माण व्हावी, यासाठी घराच्या मोकळ्या जागेत तसेच शालेय परिसरात वृक्ष लागवडीस प्रोत्साहित केले जाते. वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांचे आवडते रोपटे आवर्जून लावतात. पर्यावरण दिनानिमित्त UNESCO CLUB मार्फत राबविण्यात आलेल्या PLANT A TREE-NATIONAL CAMPAIGN 2021 या उपक्रमांतर्गत विद्यार्थी वृक्षारोपण करून सहभाग नोंदवितात. शालेय परिसरात लावलेल्या झाडांची काळजी विद्यार्थी उत्तमरीत्या घेतात.

**१०० दिवस वाचन :**

विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी याकरिता जानेवारी ते एप्रिल २०२२ या कालावधीमध्ये हा उपक्रम आयोजित केला आहे. वाचनातून त्यांच्यातील जिज्ञासू वृत्ती व कल्पकतेला वाव मिळावा यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे. विद्यार्थ्यांमधील चिकित्सक वृत्ती आणि सर्जनशीलता वाढीस लागणार आहे. विविध प्रकारची माहिती शोधण्याचे, ती समजून घेण्याचे आणि त्यावर आत्मचिंतन करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित होण्यास मदत होईल. सदर उपक्रमासाठी शाळेत उपलब्ध असलेली बालवाचनालयाची पुस्तके, वर्तमानपत्रे विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध करून दिली जातात.

आम्ही राबविलेले काही निवडक उपक्रम येथे सांगितले आहेत, आपण सर्व उत्तम शिक्षक, अभ्यासक ध्येयनिष्ठ व सजग आहात. आपल्या हातून सृजनशील विद्यार्थी घडावेत यासाठीच आपण सर्व अत्यंत तळमळीने प्रयत्नरत आहात, परंतु या लेखातून तुम्हांला आणखी नवीन काही मिळाले तर आम्हांला आनंदच वाटेल. भविष्यातील तुमच्या सृजनशील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!


श्रीमती अंजली बंडोपंत पजगाडे (मु.अ.)

**जि. प. उच्च प्राथमिक शाळा कात्री,**
**ता. कळंब, जि. यवतमाळ**


व्हिडिओ लिंक :

https://photos.app.goo.gl/hd२GXsBDy ८८t३wzs८

◈◈◈

# वाटचाल सौजन्यशीलतेकडे

सृजनशीलता म्हणजे परिस्थितीमध्ये पूर्वीपेक्षा वेगळे, स्वतंत्र आणि उपयुक्त असे काही तरी निर्माण करणारे म्हणजे सृजनशीलता. मूळ संकल्पना, विचार सुचविणे किंवा जुन्या गोष्टींकडे नव्या दृष्टिकोनातून पाहणे या मागे सृजनशीलता असते आणि हाच प्रयत्न आमच्या खरसई मराठी शाळेत शिक्षकांनी, मुख्याध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी केला आहे. आमच्या शाळेतील मुलांनी राबविलेल्या उपक्रमांमधून तुम्हांला नक्कीच मुलांच्या सृजनशीलतेचा उत्तम आविष्कार होईल.

ज्याप्रमाणे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी यांनी नवनवीन उपक्रम राबवून ते यशस्वी करण्याचा प्रयत्न केला त्याचप्रमाणे इयत्ता पहिलीच्या मुलांच्या पालकांनीही खूप प्रयत्न केला आहे, याचे कारण म्हणजे कोविड-१९ महामारीच्या काळात सर्व मुलांचे शिक्षण सुरू राहावे यासाठी देशपातळीवर प्रयत्न होत आहेत. तेव्हा या मुलांच्या पालकांनी ऑनलाइन पद्धतीने शिक्षकांकडून मार्गदर्शन घेऊन मुलांकडून उपक्रम राबवून घेतले आहेत.

सृजन बालभारतीने जागतिक पातळीवर विज्ञान व तंत्रज्ञान यामध्ये होणारी प्रगती त्या अनुषंगाने जागतिक, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात होणारे बदल विचारात घेऊन विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्यासाठी विविध घटकांचा विचार करून पाठ्यपुस्तकाची निर्मिती केली आहे. या पाठ्यपुस्तकाची अंमलबजावणी सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षापासून आदर्श शाळांमध्ये करण्यात आली आहे.

एकविसाव्या शतकात विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्यासाठी सृजन बालभारती या पुस्तकातील विविध संकल्पनांचा वापर करून आम्ही आमच्या शाळेत नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत.

**आमचे नावीन्यपूर्ण उपक्रम - इयत्ता पहिली :**

**उपक्रम १ : माझे कुटुंब या घटकांतर्गत स्वतःच्या कुटुंबाची ओळख करून देणे :**


या उपक्रमांतर्गत मुलांनी चित्रे, व्हिडिओ, फोटो ट्री अशा विविध कृतींद्वारे स्वतःच्या कुटुंबाची ओळख करून दिली.



या उपक्रमामुळे मुलांना स्वतः, स्वतःचे नातेसंबंध यांची ओळख आनंददायी पद्धतीने झाली. व्हिडिओ तयार करीत असताना पालकांनीही या उपक्रमाचा आनंद घेतला. व्हिडिओमध्ये स्वतःला बोलताना पाहून विद्यार्थ्यांना आनंद झाला व त्यांच्यामध्ये एक प्रकारचा आत्मविश्वास निर्माण झाला. व्हॉट्सअॅप ग्रुपवर एका विद्यार्थ्याचा व्हिडिओ पाहून ग्रुपमधील इतर विद्यार्थ्यांना व पालकांनाही प्रोत्साहन मिळाले.

### उपक्रम २ : आनंददायी पद्धतीने अंकांची ओळख :

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी अंककार्ड, वस्तू मोजणे, रांगोळीमध्ये बोटाने अंक काढणे, अंकांचे गाणे म्हणणे. तोंडी अंक बोलून व्हिडिओ बनविणे इत्यादी पद्धतीने अंकांची ओळख करून घेतली.






रायगड जिल्हा परिषद खरसई, मराठी शाळेत वर्गात राबविलेल्या इतर उपक्रमांची यादी :

१) पाने, फुले, डाळी यांच्या साहाय्याने कलाकृती सादर करणे.

२) वेशभूषेत तुम्हांला व्यावसायिकांची ओळख करून देणे.

३) रांगोळीतून गणितीय संकल्पनांची ओळख करून देणे.

४) परसबाग निर्मितीतून भाज्यांची ओळख करून देणे.

५) सुंदर हस्ताक्षर मोहीम.

६) श्रमदानातून विविध नैतिक संवर्धन करणे.

श्रीम. शारदा शामराव कोळसे (बी.ए.,डीएड)
वर्गशिक्षिका, इयत्ता पहिली
मार्गदर्शक : श्री मोरे सर (केंद्रप्रमुख)
श्री. बालाजी राठोड (मुख्याध्यापक)
**रायगड जि. प. आदर्श शाळा खरसई मराठी उच्च प्राथ.**
**शाळा गोंधळी, ता. म्हसळा, जि. रायगड**

# वाटचाल सृजनशीलतेकडे

कोविडचा काळ आम्हां सर्वांसाठी खूप भयंकर असा होता. कोविडच्या संकटामुळे दि. २१ मार्च, २०२० पासूनचा लॉकडाऊन आम्हां सर्वांना अस्वस्थ करीत होता. महाराष्ट्र शासनाने आदरणीय शिक्षणमंत्री श्रीम. वर्षा गायकवाड यांच्या दूरदृष्टीने शिक्षण सुरू राहावे यासाठी विविध पर्याय उपलब्ध करून दिले होते.

आमची शाळाही अतिशय दुर्गम भागातील. शाळेतील विद्यार्थिनी धडगाव तालुक्यातील अतिदुर्गम भागातील आहेत. शाळेत इयत्ता सहावी ते दहावी पर्यंतचे वर्ग आहेत. सन २०२१–२२ या वर्षात विद्यार्थिनींच्या शिक्षणात खंड पडू नये यासाठी ऑनलाइन शिक्षणाबरोबर गृहभेट व प्रत्यक्ष अध्यापनावर भर देण्यात आला. कोविड काळात विद्यार्थिनींच्या शिक्षणात खंड पडल्याने शिक्षण विभागाच्या निर्देशानुसार दि. १ जुलै ते १४ ऑगस्ट २०२१ या कालावधीत सेतू अभ्यास घेण्यात आला. सेतू अभ्यास घेण्यासाठी प्रत्यक्ष गावात जाऊन तसेच ऑनलाइन मिटिंग, व्हॉट्सअॅप, पालक भेटी व विद्यार्थिनी गृहभेट असा त्रिस्तरीय कार्यक्रम आखण्यात आला. सेतू अभ्यासक्रमाचा उद्देश समजावून सांगण्यात आला.

'शाळा बंद; पण शिक्षण सुरू' या उपक्रमांतर्गत ज्या विद्यार्थिनींना आठवड्यातून एक किंवा दोन दिवस शाळेत प्रत्यक्ष येणे शक्य होते त्यांच्यासाठी अध्यापन करण्यात येत होते. भाषा व गणित अध्ययन समृद्धीसाठी शैक्षणिक साहित्य संच पेटी तसेच इंग्रजी पेटीचा वापर करून विद्यार्थिनींना गटात अध्यापन केले जात होते. यासाठी गटातील ज्या विद्यार्थिनींचे वाचन चांगले होते त्याचा उपयोग इतर विद्यार्थिनींना वाचन प्रवृत्त करण्यासाठी करण्यात आला. त्यासाठी शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

https://youtu.be/GPNXo३aM६h८

माध्यमिक शिक्षण विभाग, नंदुरबार मा. शिक्षणाधिकारी श्री. कदम साहेब यांच्या प्रेरणेतून तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या सहकार्याने, मा. गटशिक्षणाधिकारी, मा. विस्तारअधिकारी, केंद्रप्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयात 'पंचसूत्री कार्यक्रम' राबविण्यात आला. यामध्ये 'शाळा आपल्या दारी, ज्ञानगंगा घरोघरी' या उपक्रमातून विद्यार्थिनींची गृहभेट घेऊन वाचन व लेखन याचे महत्त्व सांगण्यात आले. 'वाटचाल करू या आकृतीकडून कृतिशिलतेकडे' यात विद्यार्थिनींच्या अंगी असलेले गुण जसे : चित्रकला, कार्यानुभव असे उपक्रम घेण्यात आले.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे आयोजित विद्यालयातील इयत्ता सातवी ते इयत्ता नववीच्या विद्यार्थिनींनी मार्च २०२१ मध्ये एलिमेंटरी, इंटरमिजिएट व ज्युनिअर या प्रमाणपत्रासाठी इंग्रजी विषयाची ऑनलाइन परीक्षा दिली. यासाठी शिक्षकांनी विद्याथिनींकडून ऑनलाइन, गृहभेटीतून, प्रत्यक्ष अध्यापनातून, इंग्रजी वाक्ये, वाक्प्रचार, व्याकरण, भाषा यांचा सराव प्रश्नपत्रिकेच्या माध्यमांतून करून घेतला. कोविड काळात विद्यार्थिनींचे शिक्षण सुरू राहावे, इंग्रजी भाषेची गोडी निर्माण व्हावी, इतर स्पर्धेत सहभाग वाढून

अनुभव संपन्न व्हावे, इंग्रजी भाषेची भीती नाहीशी व्हावी हा या परीक्षेत विद्यार्थिनींना प्रविष्ट करण्याचा उद्देश होता.

कोविड काळात विद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. दि. ५ जून 'पर्यावरण दिन', ५ सप्टेंबर 'शिक्षक दिन', ३ जानेवारी सावित्रीबाई फुले यांची जयंती 'बालिका दिवस' म्हणून साजरा करण्यात आला. यानिमित्त रांगोळी, चित्रकला, घोषवाक्ये, सामान्यज्ञान स्पर्धा, आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात आली. तसेच महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, पंडीत नेहरू यांच्या जयंती व पुण्यतिथी साजऱ्या करण्यात आल्या. १५ ऑक्टोबर डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस हा 'वाचन प्रेरणा दिवस' म्हणून साजरा करण्यात आला. तसेच याच दिवशी जागतिक 'हात धुवा दिवस' देखील साजरा करण्यात आला.

**शाळा : एक समूह, माझी जबाबदारी – माझी शाळा माझे विद्यार्थी :**

शाळा बंद झाल्याने विद्यार्थ्यांची गळती होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. आमची शाळा ही फक्त मुलींची असल्याने ही भीती मुळातच आम्हां सर्वांना होती. त्यामुळे शिक्षणातील लिंग आधारित दरी, बालविवाह, लैंगिक शोषण अशी संकटे उभी राहण्याची शक्यता होती. त्यामुळेही आम्ही सर्व जण प्रत्यक्ष गावात जाऊन विद्यार्थिनींना अध्यापन करीत होतो. या सर्व बाबी करीत असताना कोविड काळात आपली जीवनशैली कशी ठेवावी? तसेच शिक्षणाचे महत्त्वही समजावून सांगितले. यावेळी आम्ही सुशिक्षित युवक किंवा युवतींचे सहकार्य घेतले. निगदी व कुकतार या गावातील युवकांनी विशेष सहकार्य केले हे या ठिकाणी प्रकर्षाने नमूद करावे लागेल. विद्यार्थिनींचे शिक्षण अखंडित सुरू रहावे यासाठी मदत होत होती. अनेक विद्यार्थिनी आजही शाळेपर्यंत पोहोचू शकलेल्या नाहीत; परंतु शाळेतील शिक्षक स्वतः गावात, पाड्यात जाऊन विद्यार्थिनींच्या घराजवळच्या शाळेच्या मुख्याध्यापकांशी संपर्क करून त्यांचे अध्यापन आजही अविरतपणे सुरू ठेवीत आहेत.

धडगाव हा दुर्गम भाग असल्याने मोबाईल रेंज, इंटरनेट, स्मार्टफोन, घरची बेताची परिस्तिथी यामुळे अनेक समस्यांमुळे विद्यार्थिनींना शिक्षणापासून दूर राहावे लागले. याची कल्पना आम्हां सर्वांना असल्याने प्रत्येकीच्या पालकांशी वैयक्तिक संपर्क करून, शासनाने सह्याद्री वाहिनीवर सुरू केलेल्या 'टिली मिली' या कार्यक्रमाबद्दल पालकांना व आजूबाजूच्या शाळेच्या शिक्षकांच्या सहकार्याने पालक व विद्यार्थी यांना माहिती देण्यात आली होती. स्वाध्याय उपक्रमांतर्गत विद्यार्थिनींकडून स्वाध्याय सोडवून घेतले गेले. विद्यार्थिनींसाठी व्हॉट्सअॅप ग्रुप तयार करण्यात आले होते. त्यावर विविध लिंक दिल्या जात होत्या. झूम मिटिंगद्वारे विद्यार्थिनींना अध्यापन करण्यात येत होते. ज्या विद्यार्थिनींना शक्य होते त्यांना विद्यालयात बोलावून अध्यापन केले जात होते. दि. १२-११-२०२१ रोजी राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण अंतर्गत इयत्ता दहावीसाठी NAS ची परीक्षा घेण्यात आली.

शिक्षकांसाठी महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व आरोग्य विभाग यांच्या सहकार्याने शालेय आरोग्य कार्यक्रम अंतर्गत दि. २२ ते २५ फेब्रुवारी या कालावधीत ऑनलाइन प्रशिक्षण घेण्यात आले. या माध्यमातून भावनिक व मानसिक आरोग्य, आंतरव्यक्ती संबंध, मूल्ये व जबाबदार नागरिकत्व, लिंग समानता, पोषण, आरोग्य व स्वच्छता याविषयी शिक्षकांना नावीन्यपूर्ण माहिती मिळाली. याचा उपयोग विद्यार्थिनींना अध्यापन करताना होत आहे. तसेच दि. २३ डिसेंबर २०२१ व दि. २४ डिसेंबर २०२१ या कालावधीत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्यामार्फत Google Classroom Online प्रशिक्षण देण्यात आले. यात शाळेतील शिक्षकांनी सक्रिय सहभाग नोंदविला.









कोविड काळात देखील विद्यार्थिनींची विद्यालयात आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून आरोग्य तपासणी करण्यात आली. या वेळी विद्यार्थिनींची मासिक पाळी, कोरोना काळातील मानसिक व शारीरिक आरोग्य, सामाजिक अंतराचे पालन करणे, सॅनिटायझरचा योग्य वापर करणे अशा सूचना प्राथमिक आरोग्य केंद्राकडून देण्यात आल्या. अशाप्रकारे आजमितीस विद्यालयात शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करून विद्यार्थिनींना अध्यापन केले जात आहे.

**कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय सुरवाणी,**
**ता. जिंतुर, जि. परभणी**

# दप्तराविना शनिवारचा दिवस

परभणी जिल्ह्यातील पूर्णा नदीच्या काठावर वसलेले पाच हजार लोकवस्तीचे हे सावंगी (म्हाळसा) गाव येलदरी धरणाच्या नावाने महाराष्ट्राला ओळखीचे आहे. छोट्या–मोठ्या डोंगरराजींनी व आमराईने वेढलेले हे गाव आहे.




शाळेचे मुख्याध्यापक श्री. प्रकाश पांडुरंग चव्हाण व सहकारी शिक्षकांनी फारसा इतिहास नसलेल्या या शाळेचे चित्र पालटण्यासाठी संकल्प केला. गावातील सरपंच श्री. प्रमोदभाऊ चव्हाण व व्यवस्थापन समिती अध्यक्ष गजाननभाऊ चव्हाण यांच्या सहकार्याने शाळेच्या नावीन्यतेची सुरुवात झाली. वृक्षारोपण व त्यांची काळजी घेणे यामुळे आज शालेय परिसर हिरवळीने सजलेला आहे. विद्यार्थ्यांना खेळताना पाहून माकडे, खारूताई, पाखरे यांनाही खेळण्याचा मोह आवरता न यावा असे वातावरण आहे.

*वही नाही, पुस्तक नाही*
*नाही आज दप्तर,*
*नको नको घरी राहू, आज आहे*
*दप्तराविना शनिवारचा दिवस.*

*योग आहे, प्राणायाम आहे,*
*आहे आज कसरत,*
*नको नको घरी राहूस, आज आहे*
*दप्तराविना शनिवारचा दिवस.*

*वी लर्न इंग्लिश, आहे विज्ञान प्रयोग,*
*आहे श्रवणाचा दिवस,*
*नको नको घरी राहूस, आज आहे*
*दप्तराविना शनिवारचा दिवस.*

टण टण, टण टण शाळेची घंटा वाजली आणि मुले सुंदर, स्वच्छ अशा शाळेच्या आवारात गोळा व्हायला लागली. मास्क व सॅनिटायझरची शाळेच्या वतीने विशेष काळजी घेतल्यानंतर मुले योग, प्राणायाम करण्यासाठी प्रशिक्षित योगगुरूंच्या मार्गदर्शनाखाली रांगेत स्थानापन्न होतात. विद्यार्थ्यांच्या शारीरिक स्वास्थ्याचा विचार करून योगगुरू सानप साहेब स्वयंस्फूर्तीने प्रत्येक शनिवारी योग, प्राणायामाचे धडे देतात.

मार्च २०१९ पासून कोरोनाने संपूर्ण जगाला विळखा घातला. याचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर सुद्धा परिणाम झाला. भविष्यात देशाचे भवितव्य घडविणाऱ्या त्या निष्पाप बालकांच्या शिक्षणाचे काय? त्या चिमुकल्या मनांचे काय? त्यासाठी अनेक शाळांनी विविध उपक्रम राबविले, जसे 'शाळा नाही पण शिक्षण सुरू'. त्यासाठी ऑनलाइन क्लास घेतले, पण सर्व मुलांना सहभागी होता आले का? व्हॉट्सअॅप द्वारे अभ्यास पाठविला, पण प्रत्येक मुलाकडे मोबाईल उपलब्ध आहे का? गटाद्वारे शिक्षण, विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन भेटी देणे अशा अनेक माध्यमांतून आमच्या गुरुजनांनी विद्यार्थ्यांना ज्ञानदान देण्याचा प्रयत्न केला; परंतु गुणवत्ता पूर्णपणे साध्य करता आली नाही आणि म्हणूनच विद्यार्थ्यांच्या शाळेतील उपस्थितीची भूमिका महत्त्वाची ठरते.

विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी उत्साह निर्माण करण्यासाठी, शंभर टक्के उपस्थिती टिकविण्यासाठी, घरी राहून कोमेजलेल्या त्या चिमुकल्या पाखरांना घरट्यातून बाहेर काढून ज्ञानाच्या व सृजनशीलतेच्या वाऱ्याच्या दिशेने उडण्यासाठी, नसानसात, श्वासाश्वासात सुगंधी वारे भरण्यासाठी, शाळेने योग प्राणायामाच्या माध्यमातून 'दप्तराविना शनिवारचा दिवस' या शीर्षकाखाली उपक्रम राबविण्यास सुरुवात केली.

जीवघेण्या विषाणूच्या दूषित वातावरणापासून विद्यार्थ्यांना दूर ठेवण्याची व त्यांच्यात प्रतिकारशक्ती वाढविण्याची जबाबदारी आता आम्ही गुरुजनांनीच स्वीकारली. मोठ्या उत्साहात मुले प्राणायाम करायला सुरुवात करतात.





क्षणभराच्या विश्रांतीनंतर दुसरा पाडाव सुरू होतो तो, 'ओपन जिम व्यायाम' साधनाद्‌वारा कसरतीचा, मुलांच्या आनंदाचे फवारे उडायला लागतात. पंख हलवून बघू उडता येईल का? या विचारांच्या तंद्रीत मुले आळीपाळीने उपलब्ध साहित्याचा व्यायामासाठी उपयोग करतात.





**ओपन जिम साधने :**

(१) रोवर (२) सिटेड पुलर ३) शोल्डर बिल्डर ४) स्काय वॉकर ५) सीट अप बोर्ड ६) मल्टीफंक्शनल ट्रेनर ७) चेस्ट प्रेस ८) सीटेड स्टँडिंग प्लॅस्टर ९) सर्फ बोर्ड १०) अरिस्तो... इत्यादी.



मनाची एकाग्रता, बुद्धिचातुर्य, पिळदार शरीर, अध्ययन–अध्यापन प्रक्रियेत मन रममाण होणे यासाठी ओपन जिम साधनांचा वापर शनिवारच्या दिवशी घेण्यात येतो.

या वसुंधरेच्या चराचरात कणाकणांत विज्ञानाचाच प्रभाव असताना आमची मुले अंधश्रद्धा, अज्ञान, रूढी–परंपरा यांच्या विळख्यात का सापडावीत? सूर्य, चंद्र, जल, वारे, दिशा, पर्वत, ग्रह, तारे, खगोल, वनस्पती, प्राणी यांचे पूर्ण वैज्ञानिक ज्ञान मुलांना प्राप्त व्हावे. गॅलिलिओ, कोपर्निकस, आइन्स्टाइन, यांच्या शोधाबद्दल, त्यांच्या महान कार्याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती व्हायला हवी आणि तेव्हाच त्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन जागृत होईल. मांजर आडवे गेले तर काही होणार नाही, कावळा घरावर ओरडला, कुणी शिंकले, घुबड ओरडले तरीही काही होणार नाही, ही त्यांची सहज प्रवृत्ती आहे हे विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून दिले पाहिजे. बालमनाला विविध प्रश्न पडतात. जसे : टायरमध्ये हवा का भरली जाते? आपण श्वासोच्छ्वास का करतो? झाडाची पाने हिरवी का? पाऊस का पडतो? भूकंप, ज्वालामुखी कसे होतात? पक्षी आकाशात का उडतात? इंद्रधनुष्य कसे दिसते? दिवस व रात्र कसे होतात? जन्म–मृत्यू असे किती तरी प्रश्न मुलांना सदैव पडत असतात. त्यांची सोडवणूक शाळेतून झाली पाहिजे. त्यासाठी शाळेने ‘चला शिकू या प्रयोगातून विज्ञान’ हा सुद्धा उपक्रम शनिवारच्या दिवशी करावयास सुरुवात केली. सृजनशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविणे, त्या मागची महत्त्वाची भूमिका आहे.

**प्रयोग :** १) ज्वलनास ऑक्सिजनची आवश्यकता. २) चंद्रग्रहण ३) सूर्यग्रहण ४) ध्वनीचे प्रसारण ५) प्रकाशाची गती ६) उष्णतेचे संक्रमण ७) पाणी घालण्याच्या पद्धती ८) हवेचा दाब ९) पृथ्वीचे गुरुत्वाकर्षण १०) द्रवाचे पृष्ठफळ असे विविध विज्ञान प्रयोग विद्यार्थ्यांनी स्वतः गोळा केलेल्या साहित्यांमधून केले जातात. नावीन्यता, कृती, कल्पकता, परिवर्तन शीलता, थोडे मार्गदर्शन याची सांगड घालून दिली की, बालमन त्या कार्यास स्वतःला झोकून देते. स्फूर्ती व चैतन्याचा झरा खळखळून वाहायला लागतो.



योग–प्राणायाम, कसरत, वैज्ञानिक कृती अशा उपक्रमांतूनच विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता निर्माण होईल. शाळेची आस व ध्यास निर्माण होऊन, बालमन शैक्षणिक वातावरणात रममाण होईल आणि आमचा ‘दप्तराविना शनिवारचा दिवस’ सर्वांच्या स्मरणात राहील.

**जि. प. प्राथ शाळा सावंगी, (म्हा.)**
**केंद्र. केहाळ, ता. जिंतूर, जि. परभणी**

# सृजनशील अभिव्यक्ती उपक्रम

## उपक्रम १ : साने गुरुजी लिखित श्यामची आई :

**वाचन पारायण सोहळा :**

विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती जोपासणे आवश्यक आहे. आजकाल मोबाइलमुळे वाचनाकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते. तसे पाहिले तर आपल्याकडे ग्रंथसंपदा मुबलक आहे; परंतु त्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही. भाषा विषयाचे अध्यापन करीत असताना विद्यार्थी वाचनाकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून आले. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्व अभिव्यक्तीवर काही प्रश्न विचारले, तर त्यांना आपली मते मांडता आली नाहीत. त्या वेळी मी मनाशीच ठरविले, या विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लावण्यासाठी काही उपाय करणे आवश्यक आहे.

मुख्याधापक व सर्व शिक्षक यांना माझी समस्या सांगितली त्यावर चर्चा केली व आपल्या शाळेत एक अभिनव उपक्रम करूया ही कल्पना मांडली. डिसेंबर महिन्यात २४ तारखेला साने गुरुजींची जयंती असते. याचे औचित्य साधून दि. १२ डिसेंबर ते २४ डिसेंबर अखेर १० दिवस वाचन पारायण करावे ही कल्पना मांडली व सर्वांनी ती मान्य केली. २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून साने गुरुजींच्या 'श्यामची आई' या पुस्तकाने वाचन पारायण सोहळा सुरू केला. दरवर्षी या सोहळ्याचे आयोजन केले जाते.




या वर्षी या पारायण सोहळ्याचे आयोजन गावातील प्रत्येक घरामध्ये केले गेले. त्यामुळे प्रत्येक घरामध्ये 'श्यामची आई' हे पुस्तक वाचले गेले. पालकांनी या उपक्रमात उत्साहाने सहभाग घेतला.

वाचन पारायण सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागली व ग्रंथालयातील पुस्तके वाचण्याची सवय लागली. विद्यार्थी पुस्तके वाचून पुस्तकातील आशय स्वतः अभिव्यक्त करतात. हा उपक्रम सर्व शाळांना निश्चितच प्रेरणादायी ठरेल.

### उपक्रम २ : आमची इंग्लिश वर्ड बँक :

**विषय : इंग्लिश**

ग्रामीण भागातील जि. प. शाळेत शिकणारा विद्यार्थी हा बहुतेक करून शेतकरी, शेतमजूर अशा कुटुंबातीलच असतो. शाळेतील शिक्षकांच्या अध्यापनाशिवाय या विद्यार्थ्यांना इतर पुरवणी म्हणून अध्ययनाची, वेगळ्या अनुभवाची सोय उपलब्ध असते. ग्रामीण भागातील विद्यार्थी आपल्या अध्ययन मार्गदर्शनासाठी शाळेवरच अवलंबून असतात. यासाठी या विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी शाळा स्तरावर चांगल्या उपक्रमाची व अंमलबजावणीची आवश्यकता असते. शाळास्तरावरील इंग्रजीसारखा विषय आता पहिली इयत्तेपासून शिकविला जातो. शाळेव्यतिरिक्त इंग्रजी विषयाचे या विद्यार्थ्यांना अध्ययन अनुभव मिळत नाहीत.

इंग्रजीचे शाळा स्तरावर अध्यापन करताना प्रत्येक विद्यार्थ्याच्या समस्येपर्यंत पोहोचता येणार नाही; परंतु त्यांच्यामध्ये विशिष्ट प्रकारची प्रेरणा निर्माण केली तर विद्यार्थी स्वयं-अध्ययनातून स्वयंप्रेरणेने इंग्रजी भाषेच्या जवळ सहज पोहोचू शकेल अशा विश्वासातून एक नवीन प्रकल्प तयार करण्याचे ठरविले.

इंग्रजीचे शब्द पाठांतर करून, पाठांतर केलेल्या शब्दांची अर्थात चार शब्दांची चिठ्ठी शब्द, उच्चार, अर्थ अशा पद्धतीची तयार करून त्या चिठ्ठीच्या पाठीमागील बाजूस विद्यार्थ्याचे नाव, इयत्ता, हजेरी क्रमांक इत्यादी बाबी लिहून ती एका बंदिस्त पेटीत टाकली जाते. सरासरी एका महिन्याच्या फरकाने शब्दपेटी शाळेतील शिक्षक, वर्गप्रतिनिधी यांच्यासमोर उघडून त्यातील शब्दांची मोजदाद करून प्रत्येक वर्गातील पहिला, दुसरा, तिसरा असे जास्तीत जास्त शब्द पाठांतर केलेल्या विद्यार्थ्यांचे पंचांच्या समोर क्रमांक निश्चित केले जातात. नंतर ज्या विद्यार्थ्यांचे शब्द पाठांतर जास्त झाले त्यांचा नंबर निश्चित करून अशा विद्यार्थ्यांना शिक्षणप्रेमींकडून अध्ययनाशी निगडित वस्तूंची रोख बक्षीसे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दिली जातात. ज्यांनी शब्द पाठांतर व त्या वर्गाची इंग्रजी अध्ययन प्रभुत्व पातळी निश्चित करून छोट्या वाक्यरचना, इंग्रजी शब्दपेटीच्या आधाराने शाळा पातळीवर आयोजित केल्या जातात.

सदरचा उपक्रम आमच्या शाळेमध्ये २०१४ पासून सुरू होऊन आज सात वर्षे झाली चालू आहे. सदरील नवोपक्रमाचे जिल्हा व राज्यस्तरावर २०१४-१५ शैक्षणिक गुणांकन झालेले आहे.

### उपक्रम ३ : सृजनात्मक व आनंददायी अध्ययन-अध्यापन :

विद्यार्थी हे उपजतच सर्जनशील असतात. त्यांना नावीन्याची, काहीतरी करण्याची आवड असते. नवनवीन कृती करण्यात त्यांना आनंद वाटत असतो. शिक्षणातून, अध्यापनातून विद्यार्थ्यांच्या या उपजत गुणांचा विकास होणे अभिप्रेत आहे. त्यासाठी विद्यार्थी नियमित शाळेत उपस्थित असणे आवश्यक आहे. त्यासाठी स्वच्छता, स्वयंशिस्त, शिक्षकांच्या सूचनांचे पालन या बाबी त्यांच्या अंगी बाळगून त्यांना अध्ययन करताना रुची वाटावी, आनंद मिळावा यासाठी इयत्ता पहिलीच्या वर्गामध्ये असे उपक्रम राबविण्याची योजना केली.

आनंददायी अध्ययन-अध्यापन करण्यासाठी शैक्षणिक साहित्याचा वापर, विद्यार्थ्यांचा कृतियुक्त सहभाग, खेळ, गाणी इत्यादी घेऊन ते ज्ञान त्यांच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न केला.

इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांना मुळाक्षरे शिकविण्यासाठी रांगोळी पाटीचा उपयोग केला. त्यासाठी एका मोठ्या ताटात रांगोळी पसरून घेऊन त्यात बोटाने मुळाक्षरांचा लेखन सराव करून घेतला. बोटांनी अक्षर गिरविल्यामुळे विद्यार्थ्यांचा मुळाक्षर लेखन सराव उत्तम झाला. मुळाक्षरांनंतर शब्दलेखनाचा सराव सुद्धा अशाच प्रकारे करून घेण्यात आला.

रांगोळी पाटीप्रमाणेच हवा पाटी, स्पर्श पाटी या उपक्रमांचा सुद्धा अक्षर व शब्द लेखनासाठी सराव करून घेतला. त्यामुळे विद्यार्थ्यांचे वाचन, लेखन उत्तम प्रकारे झाले. हवेत अक्षर काढणे, पाटीवर अक्षर गिरविणे यामुळे विद्यार्थ्यांचे आनंददायी व नावीन्यपूर्व अध्ययन घडून आले. विद्यार्थ्यांच्या कृतियुक्त सहभागामुळे मुळाक्षरांचे ज्ञान त्यांच्या चिरकाल स्मरणात राहण्यात मदत झाली.





**श्री. मारुती चंद्रु पाटील**

**जि. प. शाळा करुंगली, ता. शिराळा, जि. सांगली.**

# यशोगाथा - एक ब्रिटिशकालीन शाळा ते आंतरराष्ट्रीय दर्जाची आदर्श शाळा

१८६५ हा ब्रिटिश राजवटीचा काळ. महाराष्ट्रातील एका छोट्या खेड्यात या कालावधीत या शाळेची स्थापना झाली. का, कशी, कोणी याची उत्तरे अनुत्तरीतच आहेत. पारतंत्र्य, स्वातंत्र्य, यश-अपयश, चढ-उतार व कीर्ती या आणि अशा कितीतरी गोष्टी अनुभवत ही शाळा नवीन युगात, नवीन शिक्षण देण्यासाठी अगदी नव्या ताकदीने आज ताठ मानेने उभी आहे.




१८६५ पासून आजपर्यंत शाळेच्या व्यवस्थापनात खूप बदल होत गेले, पण न डगमगता आपले अस्तित्व आजही तसेच ठेवून आपल्या शिक्षणव्यवस्थेत गरजेनुसार बदल करीत विद्यार्थी तथा भारताचे आदर्श नागरिक घडवीत आहेत.

खऱ्या अर्थाने जागतिक पातळीवर टिकण्यासाठी महाराष्ट्र शासनाने शाळांना आंतरराष्ट्रीय दर्जा देण्यासाठी निवडप्रक्रिया राबविली. यात महाराष्ट्रातील, कोकण विभाग तथा ठाणे, पालघर जिल्ह्यातील सुमारे १०९ शाळांनी सहभाग नोंदविला. त्यातील १०६ शाळांनी राज्यस्तरीय निवड प्रक्रियेत सहभाग घेतला. निवड प्रक्रियेत उत्कृष्ट कामगिरी व रुब्रिक्सनुसार गुणांकनात राज्यातून १३ शाळांची निवड आंतरराष्ट्रीय शाळा म्हणून करण्यात आली. त्यात कोकण विभागातून, तसेच ठाणे जिल्ह्यातील एकमेव शाळा म्हणून जिल्हा परिषद शाळा, खर्डी नंबर १ या शाळेची निवड झाली. दि. २५ डिसेंबर, २०१८ रोजी महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री यांच्या हस्ते शाळेचे नामकरण 'भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा' असे करण्यात आले. शाळेचा व शाळेच्या गुणवत्तेचा आलेख उंचावत असताना विद्यमान महाराष्ट्र शासनाने सन २०२० मध्ये तालुक्यातील एकमेव 'आदर्श शाळा' म्हणून आमच्या शाळेची निवड केली.



एकीकडे शाळेचा दर्जा, शाळेची किर्ती वाढत होती. तसेच शाळेच्या गुणवत्तेत देखील वाढ होत होती. शाळेने विद्यार्थी गुणवत्ता विकासाला केंद्रबिंदू मानून व महाराष्ट्र शासनाने दिलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शिक्षक प्रशिक्षणाचा उपयोग करून विद्यार्थ्यांना शिकविण्याच्या पद्धतीत आमूलाग्र बदल केला. शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना चार भिंतीत बंदिस्त न ठेवता, विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण होण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या मनातून विषयांची भीती दूर करण्यासाठी विषयगोफ पद्धतीने अध्यापन सुरू केले. शिक्षण त्यातील विषय व विषयांतील घटक व घटकांमधील घटना या विद्यार्थ्यांना आपल्या व आनंददायी वाटाव्यात यासाठी त्यांना चार भिंतीत अडकवून न ठेवता निसर्गात प्रत्यक्ष अनुभव देऊन अध्यापनासाठी सुरुवात केली. कठीण व निरस वाटणारे घटक हे विविध उपक्रमांतून राबविण्यात येऊ लागले. उदाहरणार्थ, गणितातील नफा-तोटा, व्यवहारज्ञान यासाठी 'खाऊ जत्रा' तर नागरिकशास्त्रातील नगरपंचायत, ग्रामपंचायत, बँक, बसस्थानक, रेल्वे स्टेशन, पोलीस स्टेशन इत्यादी ठिकाणी प्रत्यक्ष क्षेत्रभेटी देऊन हे घटक शिकविले जाऊ लागले. विज्ञानातील वनस्पती, नद्या, तलाव, विहिरी, प्राणी व त्यांचे निवारे, उपयोग यासाठी प्रत्यक्ष क्षेत्रभेट या सर्व गोष्टींमुळे शिक्षणपद्धती आनंददायी झाली. कंटाळवाणे वाटणारे विषय हवेहवेसे वाटू लागले. मुलांचा शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलून गेला. याचे फलस्वरूप म्हणून सन २०१७ मध्ये १२५ एवढा असलेला शाळेचा पट आज ५१३ इतका झाला असून, इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत असणारी शाळा आज नैसर्गिक वाढीने इयत्ता सातवीपर्यंत होऊन पुढे बारावीपर्यंत जाणार आहे. ही बाब आमच्या शाळेसाठी तसेच जिल्हा परिषदेसाठी नक्कीच अभिमानाची असेल. एक मराठी माध्यमाची जि. प. शाळा त्यातही गावात इंग्रजी माध्यमाच्या चार शाळा, दोन हायस्कूल्स, पंचक्रोशीत प्रत्येक गाव-पाड्यात शाळा, सर्व समाजात इंग्रजी माध्यमाच्या शाळांसाठी असलेले प्राधान्य; असे असूनही पालक त्यांच्या मुलांच्या प्रवेशासाठी आमची शाळा निवडतात हे यश नक्कीच अध्यापन पद्धतीत केलेल्या बदलाचे आहे. आज शाळेत फक्त गावातीलच नाही, तर जवळपास २० ते ३५ किलोमीटर अंतरावरून मुले शिकण्यासाठी आमच्या शाळेत येत आहेत याचे कारण आमच्या शाळेने एकच तत्त्व स्वीकारले ते म्हणजे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, वर्गातील प्रत्येक मुलाकडे वैयक्तिक लक्ष.



**प्रत्यक्ष कृतीतून अनुभव**

जिल्हा परिषदेकडून घेण्यात येणाऱ्या विविध गुणदर्शन स्पर्धेत, लोकनृत्य स्पर्धेत जिल्ह्यात शाळा सलग प्रथम पारितोषिक मिळवित आहे.

कोरोना काळात सर्व शाळा बंद असताना देखील विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून ऑनलाइन व ऑफलाइन अभ्यास सुरूच ठेवला. फलस्वरूप सन २०२० मध्ये केंद्र शासनाच्या निती आयोगाकडून आंतरराष्ट्रीय पातळीवरील 'ब्रिक्स मॅथ' या परीक्षेत जगातील आठ देशांतील सुमारे ५० लाखांपेक्षा अधिक विद्यार्थी ही परीक्षा देतात. या परीक्षेत देखील प्रथमच आमच्या शाळेतील ३० विद्यार्थी सहभागी झाले व त्यातील २१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.



आंतरराष्ट्रीय राज्यस्तरीय प्रशिक्षण

याच काळात 'विराहमिहीर' आयोजित राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात आमच्या शाळेतील इयत्ता पाचवीत शिकत असलेला लव हेमंत परदेशी हा विद्यार्थी महाराष्ट्रातील ४३५ विद्यार्थ्यांमधून प्रथम आला.

सन २०२०-२१ या वर्षी शाळेत प्रथमच नैसर्गिक वाढीने पाचवीचा वर्ग सुरू झाला व प्रथम वर्षीच शिष्यवृत्ती परीक्षेत चार विद्यार्थी हे राज्य शासनाच्या गुणवत्ता यादीत आले व एक विद्यार्थी राष्ट्रीय ग्रामीण भागात सहावा आला.

१४ नोव्हेंबर बालदिनानिमित्ताने महाराष्ट्र शासनाने आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेत शाळेतील विद्यार्थी तालुक्यात प्रथम आला आहे.

अंकनाद, पाढे पाठांतर स्पर्धेत शाळेतील चार विद्यार्थी सलग दोन वर्षे राज्यपातळीवर निवडले जात आहेत.

याबरोबरच शाळेचे मुख्याध्यापक श्री. सुधीर भोईर सर यांनी शाळेसाठी वस्तूरूपाने जवळपास ३२ लाखांचा CSR निधी मिळविला असून त्याद्वारे शाळेचे सुशोभिकरण केले आहे.



CSR मधून सुसज्ज स्वच्छतागृहे

शाळेचे मुख्याध्यापक श्री. सुधीर भोईर सर यांनी शाळेची आंतरराष्ट्रीय दर्जाची सुसज्ज इमारत बांधण्यासाठी गावाकडून मुंबई-नाशिक

महामार्गालगत पाच एकर जागा मोफत मिळविली आहे. त्याची किंमत अंदाजे रु. तीन कोटीच्या आसपास आहे. महाराष्ट्रातीलच नव्हे, तर देशातील पहिली सरकारी जिल्हा परिषद शाळा असेल, की जी पाच एकर जागेवर उभी राहणार आहे.

या सर्व कामासाठी पालक, ग्रामस्थ, पंचायत समिती तथा जिल्हा परिषदेचे मोलाचे सहकार्य लाभले.

पुढे या पाच एकर जागेवर अत्याधुनिक आंतरराष्ट्रीय दर्जाची आदर्श शाळा, महाराष्ट्रातील मॉडेल स्कूल उभारण्याचा मुख्याध्यापकांचा मानस आहे.

**भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा,**
**खर्डी नं. १, ता. शहापूर, जि. ठाणे**

# आपला वर्ग १००% प्रगत करू या!

गेली दीड–दोन वर्षे संपूर्ण जग हे कोरोनारूपी सावटाखाली झाकलेले आहे. असे असताना या सर्व परिस्थितीचा परिणाम हा बाल वर्गावर झाल्याचे दिसून येते. कुटुंबात विद्यार्थी जरी अनौपचारिक शिक्षण घेत असले, तरी औपचारिक शिक्षणाची सुरुवात ही शालेय शिक्षणाद्वारे होत असते.

प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना प्रारंभिक वाचन, अंक ओळख असणे महत्त्वाचे आहे. यासाठी शासनाने FLN म्हणजेच Fundamental Literacy and Numeracy हा उपक्रम हाती घेतला आहे. तसेच दैनंदिन अध्यापन करताना येणाऱ्या समस्यांची उकल करण्यासाठी मी माझ्या वर्गात राबविलेले उपक्रम :

**१) रांगोळी पाटी :** या उपक्रमास लागणारे साहित्य म्हणजे रांगोळी, रांगोळी जमीन किंवा पाटीवर पसरून त्या रांगोळीमध्ये बोटाने किंवा काडीने विविध अंक, अक्षर गिरविणे. रांगोळीमध्ये अंक गिरविताना मुलांना खूप आनंद मिळाला. अंकांचे व अक्षरांचे आकार लक्षात आले. सततच्या सरावाने मुलांमध्ये अंक व अक्षरांचे दृढीकरण करता आले.



**२) अंक मेहंदी :** दुसरा उपक्रम अंक मेहंदी या उपक्रमास लागणारे साहित्य म्हणजे मेहंदी कोन. विद्यार्थ्यांच्या हातावर मेहंदीने अंक, अक्षर काढणे जेणेकरून मेहंदीने काढलेले अंक, अक्षरे सतत डोळ्यांपुढे राहिल्यामुळे त्यांचे दृढीकरण होते.



शालेय वातावरण आनंदाचे असेल, तर मुलांना शाळेविषयी आवड निर्माण होते. मुले आनंदाने शाळेत येतात. तसेच १ ते १० अंक ओळख व प्रारंभिक अक्षर वाचन हे प्राथमिक स्तरावर पक्के झाल्यामुळे शिकणे कंटाळवाणे, भीतिदायक न वाटता आनंदाचे वाटते.

चला तर मग आनंदाने शिकवू या, आपला वर्ग १०० टक्के प्रगत करू या!

**श्रीम. पल्लवी रामचंद्र भोईर (उपशिक्षिका)**
आदर्श शाळा माझगाव, ता. मुरुड, जि. रायगड.

# ‘कुणी न राहो दुर्बल अज्ञ, याचसाठी हा शिक्षण यज्ञ’

वरील पंक्तीप्रमाणे समाजातील सर्व घटकांपर्यंत शिक्षणाचा यज्ञ पोहोचला पाहिजे. यासाठी शिक्षण हे एक असे माध्यम आहे ज्याद्वारे विद्यार्थ्यांच्या कलागुणांमध्ये वाढ कशी करायची आणि त्यांचा विकास कसा करायचा हे शिकविले जाते. त्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देता येते.

दि. २६ ऑक्टोबर, २०२० रोजी आमच्या केंद्रीय प्राथमिक शाळा, वेतवडे ची आदर्श शाळेसाठी निवड झाली. तो आमच्या सर्व शिक्षकांसाठी आणि गावकऱ्यांसाठी आनंदाचा दिवस ठरला.

या आधीही आमच्या शाळेने उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाढीसाठी विविध उपक्रम राबविले आहेत. आदर्श अशा संगीतमय परिपाठाने शालेय दिवसाची सुरुवात होते. सर्व परिसर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी वर्गवार गट केले आहेत. श्रमप्रतिष्ठा या मूल्याची जोपासना केली जाते. विद्यार्थ्यांचे सामान्य ज्ञान (General Knowledge) वाढविण्यासाठी प्रश्नमंजूषा कार्यक्रम घेतला जातो, पाढे पाठांतर करून घेतले जातात. वैयक्तिक स्वच्छतेकडे लक्ष देण्यासाठी मुलांना प्रोत्साहित केले जाते.

**शाळा स्तरावर राबविलेले उल्लेखनीय उपक्रम :**

१) पर्यावरण जाणीव व जागृती.
२) शाळा प्रवेशोत्सव.
३) आम्ही योगा करतो.
४) हात धुवा दिन.
५) परिसर क्षेत्रभेट.
६) वनभोजन.
७) स्वच्छता अभियान.
८) आमचा वाढदिवस.
९) दहीहंडी उत्सव.

**वर्ग स्तरावर इयत्ता पहिली :**

१) कृतियुक्त गायन.
२) बडबडगीते, नाट्रुकली.
३) सुंदर हस्ताक्षर वर्ग.
४) नाणी–नोटा ओळख.
५) गोष्टी सांगणे.
६) धान्यांचे वर्गीकरण करणे.
७) किराणा दुकान भेट.
८) मित्राचा आवाज ओळखणे खेळ.
९) वेशभूषा.
१०) दहीहंडी.
११) सावित्रीबाई फुले जयंती.
१२) कागदी वस्तू बनविणे.
१३) चित्रात रंग भरणे.
१४) मातीच्या वस्तू बनविणे.
१५) बैठे कवायत प्रकार घेणे.
१६) खाद्यपदार्थ तयार करणे.

असे अनेक प्रकारचे उपक्रम वर्गस्तरावर राबविले आहेत. ‘माझी शाळा, माझी जबाबदारी’ चांगला माणूस घडविणे हेच शिक्षणाचे खरे ध्येय आहे.

दि. १५ जून, २०२१ पासून पालकांच्या संमतीने Social Distancing व सर्व नियमांचे पालन करून प्रत्यक्ष अध्यापनास सुरुवात केली. पालकांमध्ये असणारे भीतीचे वातावरण घालविण्यासाठी Video Conference द्वारे डॉक्टरांचे मार्गदर्शन घेण्याचे आयोजन केले.

सृजन बालभारती भाग १ व २ या एकात्मिक पाठ्यपुस्तकाच्या वापरामुळे विद्यार्थ्यांमध्ये आमूलाग्र बदल जाणवले. भाषा, गणित व इंग्रजी विषय एकत्र एकाच पुस्तकात असल्यामुळे दप्तराचे ओझे कमी होण्यास मदत झाली. इंग्रजी विषयाची गोडी लागण्यास ही मदत झाली. अजूनही भरपूर उपक्रमांचा समावेश होत आहे.

अशाप्रकारे आमची केंद्रीय प्राथमिक शाळा, वेतवडे ही आदर्श शाळा आहे. तिला अजून न्याय देण्यासाठी आमचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक वर्ग, विद्यार्थी, ग्रामस्थ, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, डायट चे मार्गदर्शक, समन्वयक यांच्या पुढाकाराने, एकजुटीने, गुणवत्तापूर्ण शिक्षणाने, नावीन्यपूर्ण उपक्रमामुळे प्रत्यक्ष ’आदर्श शाळा’ बनविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न चालू आहेत.

**केंद्रीय प्राथमिक शाळा वेतवडे,**
**ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर**

# वाटचाल सृजनशीलतेकडे

*'शाळा आमची आहे किती छान,*
*आम्ही रोज शाळेला येणार'*

या गीताप्रमाणेच आहे आमची शाळा, भरपूर झाडे, मोठे मैदान, स्वच्छ पिण्याचे पाणी, मुलांसाठी, मुलींसाठी व शिक्षकांसाठी वेगवेगळी स्वच्छतागृहे, मोठे हवेशीर वर्ग, भरपूर प्रकाश व्यवस्था, उत्तम प्रयोगशाळा, विजेची सोय, विद्यार्थ्यांना शहराच्या लांबच्या भागातून येण्या-जाण्यासाठी वाहन व्यवस्था अशा अनेक सुविधा तर आहेतच, त्याचबरोबर शिक्षित, उच्चशिक्षित शिक्षकवृंद, शिपाई ताई, क्लार्क मॅडम आणि बहुआयामी उच्चशिक्षित मुख्याध्यापक श्री. घुले सर. आमच्या शाळेचे नाव आहे जिल्हा परिषद कन्या प्रशाला, परभणी.

शाळेची निवड आदर्श शाळेसाठी झाली आणि उत्साहाने सर्व शिक्षक मंडळी कामाला लागली. गेल्या दोन वर्षांत कोरोना काळात मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये म्हणून आम्ही ऑनलाइन वर्ग घेतलेच; पण त्याबरोबरच अभ्यास गटांच्या माध्यमातून व्हॉट्सअॅप, रेडिओ, टीव्ही या माध्यमांचा उपयोग केला. आमची शाळा शहरी विभागात असल्यामुळे ऑक्टोबर २०२१ मध्ये सुरू झाली. दिवाळी सुट्टीनंतर दोन महिने नोव्हेंबर व डिसेंबर आणि आता जानेवारी. आम्ही प्रत्येक विषयाचे प्रत्येक इयत्तेसाठी विविध उपक्रम घेतले. त्यातील कोरोना काळात (शाळा बंद; पण शिक्षण सुरू) घेतलेले निवडक उपक्रम पुढीलप्रमाणे :

१) कविता सादरीकरण स्पर्धा.
२) किल्ले तयार करणे स्पर्धा, गणपती, बैल तयार करणे.
३) भाषण सादरीकरण.
४) भेटकार्ड तयार करणे.
५) रांगोळी स्पर्धा.



**शाळा सुरू झाल्यावर घेतलेले उपक्रम :**

**विषय - गणित :**

'कोणतेही ज्ञान कृतीशिवाय ज्ञात होत नाही.'

'The only way to learn mathematics is do mathematics'

गणित विषय नीट समजण्यासाठी मनोरंजक वाटावा. नवीन ज्ञान मिळविणे, निरीक्षण करणे, प्रश्न सोडविणे, त्यातून आनंद मिळविणे यासाठी कृतीची जोड हवी म्हणून दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजी प्रशालेत भारतातील प्रसिद्ध गणितज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन यांची जयंती साजरी केली जाते आणि हा दिवस गणित दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवसाचे औचित्य साधून चित्रकला स्पर्धा, गणित विषयावरील

१) प्रश्नमंजुषा


२) भौमितिक आकृत्या यांचा उपयोग करून चित्र काढणे या विषयांवर चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. प्रत्येक विद्यार्थ्याने नवीन कल्पनांचा वापर करून चित्र काढले. यात पतंग, कार्टुन्स, गालिचा, घराचे नक्षीकाम, रांगोळ्या, घराच्या आकृत्या इत्यादी कलात्मक पद्धतीने केल्या होत्या.



३) मुला–मुलींचे गट पाडून गणितज्ज्ञांच्या या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. यात विद्यार्थ्यांनी श्रीनिवास रामानुजन, प्राचार्य आर्यभट्ट – गणितज्ज्ञ यांविषयी माहिती सांगितली. त्यांच्या मोलाच्या कार्याची माहिती सांगितली. या उपक्रमात इयत्ता पाचवी ते सातवी व आठवी ते दहावी मराठी आणि उर्दू माध्यमाच्या सर्व मुला–मुलींनी भाग घेतला होता. खान मॅडम, पैठणकर मॅडम, वाकळे सर, शिंदे सर, आयेशा मॅडम, बद्दी सर यांनी परीक्षकांची भूमिका पार पाडली.

## विषय मराठी :

इयत्ता पाचवी ते सातवी या गटासाठी सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, कविता व गीत गायन स्पर्धा, शब्दांच्या भेंड्या, स्मरणशक्ती स्पर्धा, समानार्थी व विरुद्धार्थी शब्द लेखन स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांमुळे शुद्धलेखन नियमांचे पालन करणे, योग्य ठिकाणी विरामचिन्हे देणे, त्याचप्रकारे शब्दसंपत्ती वाढविणे यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन उत्तम असे लिखाण केले. इयत्ता आठवी, नववी आणि दहावीसाठी निबंध लेखन घेण्यात आले. लेखनाचे विषय होते, कोरोनाने शिकविल्या मला या गोष्टी, मुलींचे लग्नाचे वय २१ वर्षे असणे योग्य की



अजय रणखांब.

कोरोना काळात काय गमावले.

कोरोना काळात आपण जितके कमावले तितक्या काही गोष्टी गमवल्या सुद्धा. भारत सरकारनी संपूर्ण बंद पुकारल्यामुळे हॉटेल, दुकाने, कार्यालये इत्यादी सर्व व्यवसाय बंद झाले. त्यामुळे अशा लोकांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले. तरुन वर्गातील काही मुला-मुलींना आपली नोकरी गमवावी लागली. तरुन वर्गातील मुलांना नोकरी नसल्यामुळे त्यांच्यात तणाव निर्माण झाला. एका गावातून दुसऱ्या वाहतूक बंद झाल्यामुळे खाजगी वाहतूकधारांचे नुकसान झाले. बस, रेल्वे, वाहतूक बंद झाल्यामुळे भारत सरकारचेही मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले.

डॉक्टर, नर्सेस आरोग्य कर्मचारी यांनी स्वतःची व कुटुंबाची पर्वा न करता कोरोना रुग्णांची सेवा केली. त्यामुळेच आज अनेक लोकांचे जीव वाचले. त्याचबरोबर पोलिसांनी आपल्याला वेळोवेळी सतर्क करून त्यांचे कर्तव्य प्रामाणिकप पार पाडले.

अयोग्य इ. दिनांक ४ जानेवारी रोजी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांनी भरपूर प्रमाणात सहभाग नोंदविला. कोरोनाचा वाढता प्रादूर्भाव, बसलेली दहशत, द्यावी लागणारी झुंज आणि यातून सकारात्मक, नकारात्मक परिणाम काय झाले यांचा मागोवा घेण्यासाठी या उपक्रमाद्वारे हा प्रयत्न केला होता तसेच बालविवाहास प्रतिबंध करण्यासाठी व शासनाचा मुलींचे लग्नाचे वय अठरा वर्षेवरून एकवीस वर्षे करण्याचा प्रामाणिक हेतू काय असावा? शिक्षण, आरोग्य, स्वावलंबन, शारीरिक स्वच्छता या बाबतीतील जागरूकता व सामाजिक जागरूकता या संदर्भात विद्यार्थ्यांची वैचारिकता प्रगल्भ व्हावी हा या उपक्रम घेण्यामागील प्रमुख उद्देश होता. या स्पर्धांसाठी सर्व शिक्षकवृंद यांनी आपली स्वतःची कल्पकता वापरून स्पर्धांना मनोरंजनासारखे स्वरूप दिले. या स्पर्धांसाठी श्रीमती कुलकर्णी, श्रीमती गौतम, श्रीमती पत्तेवार, श्रीमती सुपेकर या शिक्षिकांनी मेहनत घेतली.

### विषय : विज्ञान

चला शिकू या प्रयोगातून विज्ञान! या कार्यक्रमांतर्गत आमचे इयत्ता पाचवी ते आठवी आणि नववी ते दहावी मधील सर्व विद्यार्थी दर शनिवारी प्रयोगाचे साहित्य घेऊन येतात आणि सर्व प्रयोग स्वतः करून बघतात. या प्रयोगासाठी लागणारे साहित्य सहज उपलब्ध होणारे असते. आमच्या शाळेतील शिक्षक श्री. सोनूनकर सर तसेच बाल विद्यार्थी मित्र–मैत्रीणी याचे रेडिओवर सादरीकरण करतात यातून त्यांची जिज्ञासा, त्यांचे प्रश्न दैनंदिन निरीक्षणातून उद्भवलेल्या समस्या यांच्या संदर्भाने प्रयोगांची निवड केली जाते. त्यामुळे विज्ञानाचे प्रयोग करण्यास मुले खूप उत्सुक असतात. या संदर्भाने दिलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी मुले गुगल, यू–ट्यूब, विज्ञानाची पुस्तके यांचा वापर करतात; यातून नवीन मिळालेली माहितीसुद्धा सादर करतात. मुलींच्या आरोग्य संदर्भातील समस्या व त्यांचे निराकरण या संदर्भाने विदयार्थ्यांना श्रीमती भिसे, श्रीमती प्रधान यांनी देखील मार्गदर्शन केले. मुलींना सॅनिटरी नॅपकिनचे वाटप करण्यात आले.



**विज्ञान प्रयोग करताना विद्यार्थी**

### विषय : व्यावसायिक शिक्षण

आमच्या शाळेत इयत्ता नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक शिक्षण हा विषय हिंदी या विषयाला पर्यायी विषय म्हणून आहे. दर महिन्याला अतिथी व्याख्याता (guest lecturer) बोलावले जातात आणि किरकोळ व्यापार, ऑटोमोबाइल यांसारखे विषय शिकविले जातात त्यासाठी मॉलला भेट देणे, गॅरेजला भेट देणे असे उपक्रम घेतले जातात. व्यावसायिक शिक्षणाबद्दल पीपीटी द्वारे मार्गदर्शन केले जाते. तंत्रविषयाची माहिती दिली जाते, ज्यायोगे विद्यार्थ्यांमध्ये तंत्र विषयाची आवड निर्माण व्हावी, भविष्यात त्यांनी स्वतःचा व्यवसाय आवडीनुसार कल्पकतेने निवडावा, एखाद्या कंपनीचा मालक बनून उद्योजक बनावे याकरिता विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यात आले. श्री. गजभारे सर आणि श्रीमती आरती पतंगे मॅडम यांनी हा उपक्रम घेतला होता.



### विषय : इतिहास – भूगोल

इतिहास–भूगोल या विषयांसाठी थोर समाजसुधारक, क्रांतिवीर यांच्या जीवन चरित्रावर आधारित माहितीचे संकलन विविध पुस्तकांमधून मुलांनी केले आणि त्याचे वाचन करण्यात आले. 'मला या पुस्तकातून मिळालेले ज्ञान' या विषयांतर्गत इतिहास व भूगोल या विषयांची पुस्तके मुलांनी वाचली आणि समजलेले विचार आपल्या भाषेत मांडले. दि. ३ जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त मुलींनी विविध कविता व भाषणे यांचे सादरीकरण केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा केली होती. पर्यावरणाच्या रक्षणासाठी महिला आर्थिक विकास गट, परभणी व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सर्व विद्यार्थ्यांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. यातून पर्यावरणाच्या रक्षणासाठी कापडी पिशवीचा वापर करावा आणि प्लॅस्टिकला बंदी करावी याबद्दलचे मार्गदर्शन माननीय नायब तहसीलदार वंदना म्हस्के यांनी केले.


## विषय : हिंदी

विद्यार्थ्यांना हिंदी भाषेत बोलता यावे यासाठी हिंदी दिवस साजरा करण्यात आला. त्या दिवशी सर्व विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी हिंदीतूनच बोलावे असे आवाहन करण्यात आले होते. या दिवशी हिंदीतून कविता गोष्टी, कथा यांचे सादरीकरण करण्यात आले. हिंदी विषय शिक्षक सूर्यतळ सर, तसेच घुले सर, ढगे मॅडम यांनी महान हिंदी लेखकांचा परिचय करून दिला.

## Subject : English

During the pandemic situation we arranged :

1) poem presentation
2) speech presentation competition In school, we have taken -
    1) Find out meaning of given words from dictionary or Google and make meaningful sentences using the given words.
    2) Write a few lines in a four line notebook with punctuation marks and paragraphs.
    3) Reading activity : (A) Individual reading (B) Pair reading (C) Group reading.



(1) Reading to find out unfamiliar words (2) To find out synonyms, antonyms (3) To find out nouns, verbs, adjectives, (4) We learn English - 1) Revision-tell me about yourself, about your friend, about your school, self introduction, speak with your mother, father, sister, brother, friend (5) Word chain- write the words and complete the word chain using verbs or adjectives or nouns (6) Change the tense Activity First student says - "I am writing a letter" the other student says "I was writing" the third student says, "I will write a letter." Such innovative activities were conducted by Dhokte mam, Ahmed sir and Subhan sir.

**जिल्हा परिषद कन्या प्रशाला परभणी, जि. परभणी**

◈◈◈

# आदर्श शाळांशी संबंधित विविध शासन निर्णय

| |
|---|
| शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०२०/प्र.क्र.१४३/एसडी–६, दिनांक २६ ऑक्टोबर २०२० अन्वये, राज्यातील जिल्हा परिषद, शाळांपैकी ३०० शाळा आदर्श शाळा (Model School) म्हणून विकसित करण्यासाठी निवड. |
| शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२०/प्र.क्र.१४३/एसडी–६, दिनांक ५ मार्च २०२१ अन्वये, पहिल्या टप्प्यात राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था, महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या ८१ शाळा, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, शासकीय विद्यानिकेतने व नागरी भागातील शाळा यांचा समावेश करून राज्यातील ४८८ शाळा आदर्श शाळा म्हणून विकसित करण्यासाठी निवड. |
| शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०२१/प्र.क्र.६५/एसडी–६, दिनांक १३ डिसेंबर २०२१ अन्वये, राज्यात आदर्श शाळा विकसित करणे या योजनेअंतर्गत शाळांची दुरुस्ती/पुनर्बांधणीसाठी व नवीन बांधकामासाठी रु. ४७९.४८ कोटी इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान. |
| शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२०/प्र.क्र.१४३/एसडी–६, दिनांक ५ मार्च २०२१ अन्वये, पहिल्या टप्प्यात राज्यातील ४८८ शाळांना आदर्श शाळा म्हणून जाहीर. |
| शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २४१३(८५/१३)/अर्थसंकल्प/दिनांक २४ नोव्हेंबर २०२१ अन्वये, राज्यात आदर्श शाळा विकसित करणे नवीन लेखाशीर्ष उघडणेबाबत. |
| शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२१/प्र.क्र.६५/एसडी–६ दिनांक १३ डिसेंबर २०२१ अन्वये, आदर्श शाळांसाठी ४७९.४८ कोटी इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करणेबाबत. |
| शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२१/प्र.क्र.१८४/एसडी–६ दिनांक ४ फेब्रुवारी २०२२ अन्वये राज्यातील आदर्श सल्ला म्हणून विकसित करावयाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना लहान बांधकामासाठी निधी वितरित करणेबाबत. |
| शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२०/प्र.क्र.१४३/एसडी–६ दिनांक २२ जून २०२२ अन्वये आदर्श शाळा योजनेला ''भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजना'' हे नाव देणेबाबत. |
| शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२२/प्र.क्र.३१/एसडी–६ दिनांक २३ जून २०२२ अन्वये राज्यातील शाळांमध्ये टप्प्याटप्प्याने एकात्मिक व द्विभाषिक पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देणेबाबत. |

# आदर्श शाळांच्या अनुषंगाने सुरू असणारे उपक्रम

1. सृजन बालभारती पुस्तिका अभिप्राय संकलन (शिक्षक व पालक)
2. जिल्हा परिषदेमार्फत आदर्श शाळा दत्तक योजना
3. Team Build-up (DIET Nodal Officers, Think Tank and District IT Experts, Headmasters)
4. आदर्श शाळा भेटीअंतर्गत शैक्षणिक व प्रशासकीय बाबींवर आधारित माहिती संकलन.
5. ६७ आदर्श शाळांमधील ७७ गणित शिक्षक प्रतिनिधींसाठी गणित उद्बोधन वर्ग आणि प्रशिक्षण वर्गाचे आयोजन.




09:00